जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAY 2026
सकाळ

# मॅटमुळे कुस्तीला नवा आयाम

## ३० हून अधिक संकुलांत सरावाला वेग; दोन संकुलांना मिळाले साहित्य

■ सचिन भोसले : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३ : जिल्ह्यातील कुस्तीला आधुनिकतेची जोड मिळावी, या उद्देशाने विशेष बाब म्हणून तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांनी तब्बल ३० कुस्ती संकुलांमध्ये क्रीडा विभागाच्या माध्यमातून दहा लाखांहून अधिक किमतीची ३० मॅट उपलब्ध करून दिल्याने कुस्तीचा नूरच पालटला आहे. पारंपरिक मातीबरोबरच आता मॅटवरही जोमाने सराव सुरू असून, नवोदित कुस्तीपटूंना कौशल्यवृद्धीसाठी नवे व्यासपीठ मिळत आहे.**

जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागासह क्रीडा प्रबोधिनी, शाहूपुरी तालीम, न्यू मोतीबाग, राष्ट्रकुल, जयभवानी (बानगे), आमशी आदी ३० ठिकाणच्या कुस्ती संकुलांमध्ये नवीन मॅट बसविले आहेत. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातील खेळाडूंनाही आधुनिक पद्धतीने सराव करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

मॅटवर सराव केल्यामुळे खेळाडूंच्या तांत्रिक कौशल्यात लक्षणीय सुधारणा होत असून, जखमी होण्याचा धोका कमी झाला आहे. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये मॅटवर कुस्ती होत असल्याने स्थानिक खेळाडूंना त्या पातळीवरील तयारी करता येत




आहे. विशेष म्हणजे, अनेक नवोदित खेळाडूंनी मॅटवर सराव सुरू केल्यानंतर त्यांच्या खेळात वेग, चपळता आणि आत्मविश्वास वाढल्याचे प्रशिक्षक दादू चौगुले (कनिष्ठ) सांगतात. त्यामुळे जिल्ह्यातून अधिक गुणवंत कुस्तीपटू घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### कोट्यवधीच्या मॅटमुळे कुस्तीचा नूर पालटणार

शहरातील शिवाजी विद्यापीठ, क्रीडा प्रबोधिनी, जयभवानी तालीम (शाहूपुरी), शाहू विजयी गंगावेस तालीम, न्यू मोतीबाग तालीम, राष्ट्रकुल कुस्ती संकुल, जयभवानी तालीम (बानगे, ता.कागल), साई आखाडा मुरगूड, ज्ञानगंगा कुस्ती संकुल (माळवाडी, कोतोली),

> कुस्ती पंढरी म्हणून कोल्हापूरची ओळख आहे. येथे पारंपरिक मातीत कुस्ती खेळली जाते. आता मॅट व इतर साहित्य मिळाल्यामुळे आधुनिक कुस्तीला चालना मिळेल.
> - **विष्णू जोशिलकर**, महाराष्ट्र केसरी, वस्ताद, मोतीबाग तालीम

तात्यासाहेब कोरे क्रीडा प्रबोधिनी, सुळे कुस्ती प्रशिक्षण केंद्र, कोतोली कुस्ती संकुल, इचलकरंजी शहर तालीम, नांदगाव, संजय माध्यमिक विद्यालय, पै. गुंडाजी पाटील व्यायाम मंडळ कोपार्डे, कुंभी कासारी साखर कुस्ती संकुल, कुडित्रे, आमशी ग्रामपंचायत संकुल, बाचणी तालुका क्रीडा संकुल, भैरवनाथ कुस्ती संकुल पाचगाव, शिवाजीराव पाटील (शिरोली दुमाला), छत्रपती शाहू महाराज तालीम (वडणगे), ग्रामपंचायत नंदगाव, साई व्यायाम, आमशी, शिवशंभो कुस्ती (तिटवे), द्रोणागिरी क्रीडा मंडळ (राशिवडे), साधना कुस्ती केंद्र (कुरुंदवाड), दत्ताजीराव कदम कामगार कल्याण मंडळ (शिरोळ), वंदे क्रीडा संकुल (गंगापूर, ता. भुदरगड), जगन्नाथ बलराम फाउंडेशन (तळंदगे), शिवराज व्यायाम प्रसारक मंडळ (पट्टणकोडोली) या तालमींना प्रत्येकी १० लाख ४० हजारांच्या मॅटसह साहित्य दिले आहे. तर कुरुंदवाड तालीम, शिवतीर्थ कुस्ती (पाडळी, ता. करवीर) या दोन संस्थांना प्रत्येकी सात लाखांचे साहित्य मंजूर झाले आहे. यातील अनेक संस्थांना साहित्य देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 4 MAY 2026
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र दिन साजरा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह सर्व अधिकारी, अधिष्ठाता, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी.

प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात सकाळी ८ वाजता प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले.

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थिनींसह सामूहिक राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत, वंदे मातरम तसेच विद्यापीठ गीत गायन करण्यात आले. प्र–कुलगुरू डॉ. जाधव यांच्यासह सर्व मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. प्र–कुलगुरूंनी सर्व उपस्थितांना महाराष्ट्र दिनासह कामगार दिन आणि बौद्ध पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. राजाराम गुरव, डॉ. महादेव देशमुख, डॉ. अजय साळी, डॉ. सागर डेळेकर, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सावलीराम घाणे, डॉ. कबीर खराडे आदींसह अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी–विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAY 2026
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात तुकडोजी महाराज जयंती साजरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये गुरूवारी सकाळी प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आजीवन अध्ययन व विस्तार कार्य अधिविभागप्रमुख डॉ. रामचंद्र पवार, हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. संतोष कोळेकर, डॉ.प्रकाश मुंज, डॉ.अनिल मकर, डॉ. सुषमा मांडेकर, हेमंत जाधव, निकिता पाटील, पल्लवी वालेकर, अविनाश कांबळे, आनंदराव बेडगे, श्रीकांत देसाई, सुप्रिया पवार आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
04 MAY 2026
सकाळ

# टाइम्स एशिया रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाची भरारी

कोल्हापूर, ता. ३ : जागतिकस्तरावर विद्यापीठ गुणवत्तेचे मूल्यांकन करणाऱ्या 'टाईम्स हायर एज्युकेशन एशिया २०२६' मानांकनात शिवाजी विद्यापीठास उत्तुंग यश मिळाले. हे मूल्यांकन विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन वातावरण आणि गुणवत्ता, आंतरराष्ट्रीयकरण, उद्योग- शिक्षण, सहकार्य पंचसूत्रीवर आधारित होते.

भारतातील सार्वजनिक राज्य विद्यापीठांतर्गत शिवाजी विद्यापीठाला दहावे आणि महाराष्ट्रातील सार्वजनिक राज्य विद्यापीठांत दुसरे मानांकन मिळाले.

शिवाजी विद्यापीठाने मूल्यांकनामध्ये प्रथमच सहभाग नोंदवून या प्रतिष्ठित मूल्यांकनामध्ये शिवाजी विद्यापीठाला ३६ देशांतर्गत आशियास्तरावर ४०१-५०० मानांकन बँडमध्ये मिळाले. या आशियास्तरावरील पहिल्या ५०० मानांकनप्राप्त विद्यापीठांमध्ये भारतातील ६६ संस्था असून, यामध्ये १९ भारतीय सर्वोच्च संशोधन संस्था, नऊ केंद्रीय विद्यापीठे, दहा सार्वजनिक राज्य विद्यापीठे आणि २८ खासगी/स्वायत्त विद्यापीठांचा समावेश आहे. हे यश प्रभारी कुलगुरू सुरेश गोसावी, प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. सागर डेळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्राध्यापकांचे संशोधन आणि अध्यापन, विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सहभाग यांच्या सहकार्यामुळे शक्य झाल्याचे विद्यापीठाच्या प्रशासनाने म्हटले आहे.

# टाइम्स एशिया रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाची भरारी

**प्रथम सहभागातच राज्य विद्यापीठांत देशात दहावे स्थान**

जागतिक स्तरावर विद्यापीठ गुणवत्तेचे मुल्यांकन करणाऱ्या टाईम्स हायर एज्युकेशन एशिया २०२६ या मानांकनामध्ये शिवाजी विद्यापीठास उत्तुंग यश मिळाले आहे. हे मुल्यांकन विद्यापीठांची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन वातावरण व गुणवत्ता, आंतरराष्ट्रीयकरण, उद्योग-शिक्षण, सहकार्य या पंचसुत्रीवर आधारित असते. भारतातील एकूण सार्वजनिक राज्य विद्यापीठांतर्गत दहावे आणि महाराष्ट्रातील सार्वजनिक राज्य विद्यापीठांत दुसरे मानांकन प्राप्त झाले आहे. या मानांकनामध्ये महाराष्ट्रातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ या सार्वजनिक राज्य विद्यापीठांचाच समावेश आहे.



शिवाजी विद्यापीठाने या मुल्यांकनामध्ये प्रथमच सहभाग नोंदवून या प्रतिष्ठित मुल्यांकनामध्ये शिवाजी विद्यापीठाला ३६ देशांतर्गत आशिया स्तरावरती ४०१-५०० या मानांकन बँडमध्ये स्थान प्राप्त झाले आहे. या एशिया स्तरावरील पहिल्या ५०० मानांकनप्राप्त विद्यापीठांमध्ये भारतातील जवळपास ६६ भारतीय संस्था असून यामध्ये १९ भारतीय सर्वोच्च संशोधन संस्था, ०९ केंद्रीय विद्यापीठे, १० सार्वजनिक राज्य विद्यापीठे व २८ खाजगी / स्वायत्त विद्यापीठांचा समावेश आहे. या मुल्यांकनामध्ये शिवाजी विद्यापीठास भारतीय स्तरावर एकूण विद्यापीठांअंतर्गत १३ वी मानांकन बँड आणि सार्वजनिक राज्य विद्यापीठांतर्गत ५ वी मानांकन बँड प्राप्त झाली आहे.

पहिल्याच प्रयत्नात मिळालेले हे मानांकन विद्यापीठाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कामगिरीची साक्ष देणारी असून यामुळे विद्यापीठाची जागतिक स्तरावरील ओळख अधिक दृढ झाली आहे. हे अभिमानास्पद व ऐतिहासिक यश विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू प्रा.ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. सागर डेळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संविधानिक अधिकाऱ्यांचे पाठबळ, शिक्षकांचे सातत्यपूर्ण संशोधन व अध्यापन, विद्यार्थ्यांची एकूण गुणवत्ता, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सहभाग आणि इतर सर्व संबंधित घटकांच्या सहकार्यामुळे शक्य झाले आहे. हे यश विद्यापीठासाठीच नव्हे, तर संपूर्ण राज्य व देशासाठी अभिमानास्पद ठरले आहे. या संदर्भात कुलगुरू प्रा. सुरेश गोसावी यांनी विद्यापीठातील सर्व घटकांचे अभिनंदन केले.